# पंचायत समिती ,देवळा जि.नाशिक
# जाहिर ई निविदा सुचना क्रमांक २(प्रथम प्रसारण)

शिक्षण विभाग(प्राथमिक) जिल्हा परिषद नाशिक अंतर्गत जिल्हा परिषद विद्यानिकेत देवळा वसतीगृहासाठी सन २०१७ -१८ वर्षाकरीता ११ महिन्यांसाठी वसतीगृहातील मुलांसाठी ६%फॅट असलेले म्हशीचे दुध पुरविणे या कामाकरीता दर करार करणेसाठी पात्र मक्तेदार /पुरवठादार यांचेकडुन ई निविदा पध्दतीने निविदा मागविणेत येत आहेत.

कामाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | कामाचे वर्णन | अंदाजित रक्कम | निविदा रक्कम | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | वसतीगृहातील मुलांसाठी ६%फॅट असलेले म्हशीचे दुध पुरविणे | ४,००,०००/- | १,०००/- | ५,०००/- |

१) गटविकास अधिकारी ,पंचायत समिती ,देवळा हे या निविदेसोबत जोडलेल्या दरपत्रका मध्ये आवश्यक असलेल्या जिल्हा परिषद विद्यानिकेतन देवळा, ता.देवळा येथे वसतीगृहासाठी सन २०१७-१८ वर्षासाठी दुध पुरवठा करणेसाठी २०१७-२०१८ करीता दर निश्चित करणेसाठी सामान्य पुरवठादार किंवा सहकारी संस्थाकडून ई-निविदा मागवित आहेत.सदर ई-निविदा http://mahatender.gov.in व www.zpnashik.gov.in या संकेतस्थळावर दि. ३०/१२/२०१७ रोजी पासून दि. ०६/०१/२०१८ रोजी १७.०० वाजेपर्यत स्वीकारण्यात येतील. .मक्तेदारांनी त्यांनी भरलेल्या निविदांची प्रत शिक्षण विभाग,पंचायत समिती ,देवळा कार्यालयात दि. ०८/०१/२०१८ रोजी म्हणजेच वेवसाईट बंद झाल्याच्या दुस-या दिवशी दु.११.०० वाजेपर्यंत खालील अ.क्र.३) मध्ये नमूद केलेल्या सर्व कागदपत्रांसह सिलबंद पाकिटात जिल्हा परिषद विद्यानिकेतन देवळा, ता.देवळा साठी दुध पुरवठा २०१७-२०१८ अंतर्गत दुध निविदा लिहून निविदाधारकाने त्यांचे पूर्णनाव , पत्ता फोन नंबरसह नमुद करून सादर करावीत .उशीराने आलेल्या निविदा स्वीकृत केल्या जाणार नाही .प्राप्त निविदा शक्यतो त्याच दिवशी किंवा मा.गटविकास अधिकारी ,पंचायत समिती ,देवळा यांना सोईस्कर अशा कामकाजाच्या कोणत्याही दिवशी बघण्यात येतील .

२) कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कोणते ही कारण न देता नाकारण्याचा हक्क **मा.गटविकास अधिकारी ,पंचायत समिती ,देवळा** यांनी राखून ठेवला आहे.

३) निविदे सोबत खालील कागद पत्रे असणे आवश्यक आहे.

## अ) तांत्रिक लिफापा

१) निविदा फी रक्कम रु.१,०००/- व बयाणा रक्कम **:- रुपये-५,०००/-** ऑनलाईन नेट बँकींग पद्धतीने भरणा करणे आवश्यक राहील जर बयाणा रक्कम भरण्यापासून सूट असल्यास तसे दर्शविणारे कागदपत्र जोडणे आवश्यक आहे.

२) निविदाधारक/पुरवठादार यांनी GST नोंदणी केली असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. (मुळ प्रत स्कॅन करुन जोडावी )

३) शॉप ऍक्ट नोंदणी अद्यावत प्रमाणप्रत्र (मुळ प्रत स्कॅन करुन जोडावी )

४) वॅट / सेल्स टॅक्स भरणा निपटारा प्रमाणपत्र अद्यावत (सन-२०१६-१७)

५)सहकारी संस्थेंच्या बाबतीत मागील तीन वर्षाचे शासनाकडून / प्राधिकृत संस्थेकडून केलेल्या लेखापरिक्षणाचे अहवाल

६) अन्न व औषध प्रशासन कार्यालयाकडून अन्नभेसळ प्रतिबंधक कायदयाखालील प्रमाणपत्र (मुळ प्रत स्कॅन करुन जोडावी )

७) सहाकारी संस्थांनी निविदा भरणे बाबत त्यांचे पदाधिका-यांचा ठराव आणि ज्या व्यक्तीच्या नांवाने निविदा भरण्याचे अधिकार दिलेले आहेत. ते अधिकार पत्र निविदे सोबत जोडावे.

८) आयकराचा PAN CARD No. नमूद करावा तसेच PAN CARD चा साक्षांकित प्रत जोडावी .

९) अशा प्रकारचे काम केल्याचा किमान तीन वर्षाचा अनुभवाचा दाखला.

१०) निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे बंधपत्र (रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर)
(मुळ प्रत स्कॅन करुन जोडावी )

४) सशर्त निविदा विचारात घेतली जाणार नाही.

५) ज्या निविदेमध्ये निश्चित दर दिलेले नसतील अथवा दिलेल्या दरा मध्ये संदिग्धता असेल अशी निविदा नाकारली

६ )जाण्यास पात्र ठरेल .जर अक्षरी व अंकी यामध्ये तफावत असल्यास दोन्ही पैकी जो दर कमी असेल तो दर विचारात घेतला जाईल.

७) सूरक्षा अनामत :- ज्या निविदाधारकांची निविदा स्विकृत केली जाईल त्या निविदाधारकांनी पूरवठा करवयाच्या एकूण किमतीच्या ५% एवढी सूरक्षा अनामत रक्कम भारतीय स्टेट बँक शाखा देवळा येथे चलनाने भरणे आवश्यक आहे.सदर रक्कमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.

८) यशस्वी निविदाधारकाने निविदा स्विकृतीच्या दिवसापासून आठ दिवसाच्या आत सूरक्षा रक्कमेचा भरणा केला नाही तर. त्यांची निविदा रद्द करण्यात येवून त्यांचे निविदे सोबत भरणाकेलेली बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल

९) निविदाधारकाने नमूद केलेले दर हे सर्वकरासहीत जकात,वहातूक खर्च , चढाई ,उतराई,पॅकीग व जि.प.वि.नि. देवळा पर्यंत पोहोच इत्यादी सह असावेत.

१०) विलंबाचा पूरवठा:- जर पुरवठाधारकांने मागणी केल्या पासून त्वरित एका दिवसात पुरवठा केला नाही तर सदर मागणी नोंदविलेल्या साहित्यांचा किमंतीच्या (अर्धा टक्का) प्रतिदिन या दराने दंड करण्यास मा.गटविकास अधिकारी (उ.श्रे),पंचायत समिती ,देवळा हे सक्षम आहेत.

११) पुरवठा कालावधीत साहित्य पूरविण्यास जर पुरवठाधारक असमर्थ ठरल्यास किंवा पुरवठाधारकांने पूरवठा केलेल्या साहित्यामधील काही साहित्य अस्विकृत झालेले असल्यास असे अस्विकृत साहित्य मुदतीत बदलून दिले नाही तर मा.गटविकास अधिकारी (उ.श्रे),पंचायत समिती ,देवळा हे त्यांना योग्य वाटेल अशा कोणत्याही पुरवठादाराकडून त्यांना योग्य वाटणा-या अशा दराने उर्वरीत साहित्य खरेदी करण्यास सक्षम रहातील.

अ) कसुरदार पुरवठाधारकांची पुरवठा करण्याची तयारी विचारात घेतली जाणार नाही.

ब) कसूरदार पूरवठाधारकांस दोन्ही दरा मधील किमंतीच्या फरक अथवा १०% टक्के रक्कम यापैकी जी जास्त रक्कम असेल तेवढया रक्कमेचा दंड करण्यात येईल.

क) जर कसुरदार पूरवठाधारकाने दंड रक्कमेचा भरणा केला नाहीतर त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन त्यंाचे नांव काळया यादीत समाविष्ठ केले जाईल. व या जिल्हा परिषदेच्या पुढील कोणत्याही खरेदीच्या वेळी त्यांचे निविदेचा विचार केला जाणार नाही.

१२) प्रदाने:- पुरवठा केलेल्या साहित्यांचे प्रदान साहित्यांचा पुरवठा संबधित अधिका-यांना पुरवठा केलेले साहित्य निविदे नुसार व चांगल्या प्रती मध्ये प्राप्त झाल्यावर केले जाईल. बिल अदा करण्यास विलंब झाल्यास रक्कमेवर व्याज दिले जाणार नाही.

१३) मंजुर पुरवठाधारक यांनी साहित्याचा पुरवठा स्वतं:च करावयाचे आहे त्यांना उप पुरवठादार नेमता येणार नाही याची नोंद घ्यावी.

१४) निविदा मंजुर झालेल्या कालावधीत किंवा पुढील ठेका मंजूर होई पर्यत उपरोक्त मंजुर दराने मालाचा पूरवठा व काम करणे बंधनकारक राहील.

१५) पुरवठा केलेल्या मालाच्या देयकातून शासन नियमाप्रमाणे आयकराची रक्कम वसूल करण्यात येईल.

१६) निविदा स्विकृत झालेनंतर यशस्वी निविदाधारकास ५% अनामात रक्कम पंचायत समिती ,देवळा कडे जमा करुन रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर जि.प.सोबत रितसर करारनामा करुन देणे बंधनकारक राहील. त्यात वरील अटी शर्तीचा सतावेश राहील. करारनामा करतेवेळी या अटी मध्ये कोणताही बदल करण्याचा अधिकार मा.गटविकास अधिकारी (उ.श्रे),पंचायत समिती ,देवळा यांना राहील.

१७) या निविदेतीन अटी व शर्ती बाबत कोणत्याही प्रकारचा वाद उदभवल्यास मा.गटविकास अधिकारी (उ.श्रे),पंचायत समिती ,देवळा यांचा निर्णय अंतीम राहील. तसेच मंजूर निविदा कोणत्याही वेळी रदद करण्याचा अधिकार मा.गटविकास अधिकारी (उ.श्रे),पंचायत समिती,देवळा, यांनी राखुन ठेवला आहे हे मला मान्य आहे.

१८) वरील सर्व नियत अटी शर्ती आंम्ही पूर्णत: वाचल्या .असून त्या मान्य असल्या बाबतचे बंधपत्रक जोडणे आवश्यक आहे.

१९)दुध पुरवठाचे अटी व शर्ती

१) जिल्हा परिषदेने प्रत्येक विद्यार्थ्यासाठी दैनंदिन विहित केलेल्या प्रमाणातच दुधा चे प्रमाणानुसार व विद्यार्थिसंख्येनुसार पुरवठा करणो बंधनकारक राहील.

२) दुध सकाळी ७=०० वाजेपर्यत पोहोच करणे बंधन कारक राहील.

३) फक्त म्हशीच्या दुधाचा पुरवठा करणे बंधन कारक राहील.

४) म्हशीचे दुध - ६% फॅट असलेले पुरवठा करणे बंधन कारक राहील.

५) आपणा मार्फत पूरविण्यात येणारे दुध सील बंद कॅनमधुन असावे व ती कॅन रोज घासून व स्वच्छ करुन दुधा सह स्वयंपाकघरात पोहोच करणे बंधनकारक राहील.

८) विद्यार्थ्यांना दुधातून विषबाधा किंवा इतर शारिरिक अपाय झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील व अशा प्रकरणी विद्यार्थ्यांना दवाखाण्यात नेणे, आणणे औषधोपचार इ.चा खर्च ठेकेदारावर बंधनकारक राहील.

९) दुध चविष्ट नसल्यास होणारी नुकसान भरपाई ठेकेदाराकडून वसूल करण्यात येईल व ती ठेकेदारावर बंधनकारक राहील .

१०) दुधाचे फॅट वेळोवेळी मोजून देणे बंधनकाराक राहील.

११) दुध देतेवेळी मोजून देणे बंधनकाराक राहील.

२०) निविदाधारकास निविदेसोबत बयाना रक्कम रु.- ५०००/- म.ग.वि.अ.पं.स.देवळा यांचे खाते भारतीय स्टेट बँक शाखा देवळा खाते क्र ३६८२६७६७२० देवळा IFSC-SBIN०००५१२६ BRANCH CODE ५१२६ या खात्यात भरणा केल्याचे मुळ चलन सादर करणे बंधनकारक राहील. त्या शिवाय निविदेचा विचार केला जाणार नाही.

२१) निविदा स्विकृत झालेनंतर यशस्वी निविदाधारकास ५% अनामात रक्कम पं.स.देवळा कडे जमा करुन रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर जि.प.सोबत रितसर करारनामा करुन देणे बंधनकारक राहील.

२२) वरील अटी व शर्तीचा करारनाम्यात समावेश राहील तथापी करारनामा करतेवेळी अटी मध्ये कोणताही बदल अथवा वाढ करण्याचा अधिकार मा.गटविकास अधिकारी (उ.श्रे) ,पंचायत समिती ,देवळा यांनी राखून ठेवला आहे.

२३) अटी व शर्ती बाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास मा.गटविकास अधिकारी (उ.श्रे) ,पंचायत समिती ,देवळा यांचा निर्णय अंतिम राहील व तो बंधनकारक राहील .

२४) नमूद अटीपैकी कोणत्याही अटी शर्तीचा भंग झाल्यास दिलेला ठेका रद्द करण्यात येईल व त्याबददल कोणतीही नुकसान भरपाई मागण्याचा हक्क राहणार नाही.शिवाय जमा केलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

२५) निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क मा.गटविकास अधिकारी (उ.श्रे),पंचायत समिती ,देवळा यांनी राखून ठेवला आहे.

स्वाक्षरीत/-
गट शिक्षण अधिकारी
पंचायत समिती देवळा

स्वाक्षरीत/-
गटविकास अधिकारी
पंचायत समिती देवळा

## दुध पुरवठया बाबत बंधपत्र(रु.१००/- चे स्टॅम्पवर)

आम्ही गांभीर्य पुर्वक नमुद करतो की, आम्ही वर नमूद केलेल्या ६% फॅट असलेले म्हशीचे दूध पुरवठा या कामासाठीच्या निविदेतील सर्व अटी शर्ती वाचल्या असून या निविदे साठी आमचे दर निवेदेसोबतच्या प्रपत्रात नमूद केलेले आहेत.

आमची निविदा स्विकृत करण्यात आल्यास निविदेतील सर्व अटी व शर्तीचे पालन करण्यास आम्ही बांधील राहू. आम्ही या अटी व शर्तीचा भंग केल्यास त्यात दिलेल्या तपशिला नुसार आम्ही दंडनीय कार्यवाहीस पात्र राहू.

आमची निविदा स्विकृत झाल्यास आम्ही दिलेल दर हे पूढील आदेशा पर्यत आमचेवर बंधनकारक रहातील.

आम्ही निविदा प्रपत्रा मधील अटी शर्तीतील अट क्र.१ ते २५ नुसार पुरवठा करण्यास बांधील राहू.

दिनांक:- / /२०१७

निविदाधारकाची सही

नाव:

पत्ता:

## ब) व्यापारी लिफाफा

| तपशिल | वर्णन | दर -प्रति लिटर | शेरा |
|---|---|---|---|
| म्हशीच दूध पुरवठा करणे | १) दुध सकाळी ६=०० वाजेपर्यत पोहोच करणे<br>२) फक्त म्हशीच्या दुधाचा पुरवठा करणे<br>३) म्हशीचे दुध - ६% फॅट असलेले असावे<br>४)दुध सील बंद कॅनमधुन असावे व ती कॅन रोज घासून व स्वच्छ केलेली असावी<br>५) दुधाचे फॅट वेळोवेळी मोजून देणे<br>६) दुध देतेवेळी मोजून देणे | अंकी -<br>अक्षरी - | |